**<u>२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम</u>**

नि.दि.दा.क्र.२६०/२०२३
बबन वि. मुन्नी
**निशाणी क्र.३४ खाली**

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. आर.व्ही.मोटे यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>**

**०१.** प्रस्तुतचा दावा हा नगरपरिषद घर क्र.४५२५ चा ताबा मला प्रतिवादीकडुन परत मिळावा म्हणुन दाखल केला आहे. मी पुणे येथे पंचवीस ते तीस वर्षापासुन राहतो. आशाबाई ही माझी बहीन आहे व ती तिच्या सासरी पुणे येथे राहते. मी पी. डी आकरे वकीलांना ओळखत नाही. त्यांचे व माझे काही वाकडे नाही. नि.क्र.२२ वर नोटिस देणार म्हणुन माझे नाव आहे. नि.क्र.२२ वरील नोटिसमध्ये घराचा ताबा मिळावा म्हणुन विनंती केली आहे. दिनांक ०४.०७.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१ याने नि.क्र.२१ सोबत नोटिसची प्रत दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या नोटिसची प्रत माझ्या विधिज्ञांकडुन मला मिळाली होती. नोटिसची प्रत मिळाले तारखेपासुन मी आकरे वकीलांविरुध्द कोणतीही तक्रार केली नाही. नि.क्र.२२ वरील नोटिसची प्रत मिळाल्यापासुन मी आकरे वकीलांकडे जाऊन नोटिसबाबत कोणतीही चौकशी केली नाही. घर क्र.४५२५ वरती माझा ताबा असलेले कागद मी न्यायालयात दाखल करु शकतो. नळ पट्टी, घर पट्टी भरलेले पावती मी न्यायालयात दाखल करु शकतो.

०२. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीच्या आईचे नाव चांदबिबि गुलाब शिकलकर आहे. चांदबिबि हिस किती मुली आहेत हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी व त्यांची बहीन ह्या नांदत नसुन त्यांचा घटस्फोट झालेला आहे व त्या त्यांच्या आईसोबत राहतात. हे म्हणणे खरे आहे की, बऱ्याच दिवसांपासुन ते त्यांच्या आईसोबत राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील मच्छींद्र हे भूम येथे एकटे राहत होते व त्यांची प्रकृती ही चांगली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी पुणे येथे राहत असल्याने माझे वडीलांकडे लक्ष नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी आठ वर्षाचा असताना दिनांक १७.१२.१९८४ रोजी प्रतिवादीची आई चांदबिबि शिकलकर हिच्या नावे दावामिळकतीचा

माझ्या वडीलाने ९९ वर्षाचा कराराआधारे ६००० रुपयांस करारनामा लिहुन दिला. माझी जन्म तारीख ०१.०३.१९७६ आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलाने या कराराआधारे १७.१२.१९८४ ला दावामिळकतीचा दावा चांदबिबि हिला दिला. हे म्हणणे खरे नाही की, १९८४ सालापासुन चांदबिबि व तिच्या दोन मुली विवाद्य दावामिळकतीच्या घरजागेत राहतात. हे म्हणणे खरे नाही की, १९८४ सालापासुन नगरपालिकेचा कर हे प्रतिवादी भरतात. सदरच्या करारनाम्याबाबत मला मागील तीन वर्षापुर्वी झाली. करारनाम्याबाबत माहिती झाल्यानंतर तो रद्द करण्याबाबत मी कोणतीही कायदेशीर कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, कायदेशीर कारवाई न करण्यामागचे कारण तो करारनामा मला मान्य आहे.

०३. हे म्हणणे खरे नाही की, १९८४ सालापासुन चांदबिबि व तिच्या दोन मुलींचा कायदेशीर दावामिळकतीवर कायदेशीर ताबा आहे. हे म्हणणे खरे आहे की, चांदबिबि हया सध्या जिवंत आहे. हे म्हणणे खरे नाही की, चांदबिबि व प्रतिवादी हे सध्या एकत्र राहतात. प्रतिवादी हे सध्या इंदिरा नगर येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, मी दाव्यामध्ये प्रतिवादीच्या नावापुढे तिच्या वडीलांचे नाव लिहिलेले आहे.

०४. हे म्हणणे खरे नाही की, दावामिळकतीचे मी व माझी बहीन मालक नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझी बहीन दोघे दावामिळकतीच्या घरजागेत राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वादी व प्रतिवादी दावा दाखल करण्यापुर्वीच्या दोन वर्ष आम्ही एकत्र आलो नाहीत. माझी प्रतिवादीची भेट दावा दाखल करण्याच्या दोन ते चार वर्षापुर्वी झाली. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५.०३.२०२३ ला माझ्या व प्रतिवादीमध्ये कसलेही बोलणे झाले नव्हते. दिनांक २५.०३.२०२३ रोजी माझी व प्रतिवादीचे बोलणे हे कोर्टामध्ये झाले होते. किमान २५.०३.२०२३ पुर्वी माझी व प्रतिवादीची भेट ही पाच ते सहा वर्षापुर्वी झाली होती. दिनांक २५.०३.२०२३ रोजी भेट झाल्यानंतर मी न्यायालयात किती दिवसांनी दावा दाखल केला हे मला लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचा मृत्यूच्यावेळेस दावामिळकतीवर ताबा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, वडीलांच्या मृत्यूनंतर सदरच्या मिळकत ही आमच्या ताब्यात आले हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. मी कोणसही साक्षीदार म्हणुन

तपासणार नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, मला साक्षीदार तपासायचे आहेत.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

स्वाक्षरीत/–

दिनांक ०४.०७.२०२६

**(श्रीमती ए. एस.मते)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
भूम.